# जिल्हा परिषद अहिल्यानगर
# लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर
# यशोगाथा

---

जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागा मार्फत सन 2023-24 व 2024-25 या वर्षात पाणी साठवण क्षमता वाढविण्याकरिता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचे मार्गदर्शनाखाली 2702 जिल्हा वार्षिक योजना ,जलयुक्त शिवार अभियान 2.0, अटल भुजल योजना अंतर्गत बंधा-यांची कामे हाती घेण्यात आली आहे.

## 2702 जिल्हा वार्षिक योजना -

सन 2023-24 मध्ये साठा बंधारा 3.12 कोटी व को.प.बंधारा 2.10 कोटी एवढा निधी प्राप्त झालेला होता. त्यामध्ये साठा बंधारे 17 कामांपैकी 12 कामे पुर्ण झाली. हे कामे पुर्ण झाल्यामुळे 163 सघमी साठवण क्षमता निर्माण झाली व 31 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

को.प बंधारे 11 कामांपैकी 8 कामे पुर्ण झाली. हे कामे पुर्ण झाल्यामुळे 111 सघमी साठवण क्षमता निर्माण झाली व 25 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

सन 2024-25 मध्ये साठा बंधारा 7.17 कोटी व को.प.बंधारा 2.19 कोटी एवढा निधी प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये साठा बंधारे 50 कामे हाती घेण्यात आली आहे. सदर कामे पुर्ण झाल्यानंतर 468 सघमी साठवण क्षमता निर्माण होणार आहे. व 102 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

को.प बंधारे 15 कामे हाती घेण्यात आली आहे. सदर कामे पुर्ण झाल्यानंतर 136 सघमी साठवण क्षमता निर्माण होणार आहे. व 31 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. तसेच बंधा-यालगत शेतक-यांना लाभ होईल.

## अटल भुजल योजना सन 2023-24 –

अटल भुजल योजने अंतर्गत निवडलेल्या गावांअंतर्गत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शनखाली नवीन बंधारे व दुरुस्ती आवश्यक बंधारे कामे हाती घेण्यात आली आहे. या योजने अंतर्गत 36 कामांपैकी 28 कामे पुर्ण झाली आहे. हे कामे पुर्ण झाल्यामुळे 839 सघमी साठवण क्षमता निर्माण होणार आहे व 177 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

## जलयुक्त शिवार अभियान 2.0 –

सन 2023-24 व सन 2024-25 अंतर्गत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाकडिल 78 कामांना प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. 78 कामांपैकी 11 कामे पुर्ण झाली आहे. उर्वरित नवीन व दुरुस्ती कामे पुर्ण झाल्यानंतर मुळ साठवण क्षमता व सिंचन क्षमता पुर्नस्थापित होणार आहे.

# <u>लेखाशिर्ष - अटल भुजल योजना</u>

कामाचे नाव - नांदगाव साठा बंधारा विजय गुंड शेत ता.कर्जत जि.अहमदनगर




कामाचे नाव - को प बंधारा दुरुस्ती दत्त मंदिर कुंभरगाव रस्ता ता.कर्जत जि.अहमदनगर



# <u>लेखाशिर्ष – जिल्हा वार्षिक योजना</u>

कामाचे नाव -  को.प.बंधारा गटेवाडी दरा (पाणीपुरवठा विहिरीजवळ) ता.पारनेर



कामाचे नाव -  साठा बंधारा चिल्लार ओढा नान्नज ता.जामखेड




सदर बंधा-याचे काम झाल्यामुळे भुगर्भातील पाणी पातळीत वाढ झाली आहे.त्यामुळे सिंचनात वाढ होऊन उत्पाननात वाढ झाली आहे. त्यामुळे आमचे राहाणीमान आर्थिक दृष्या सुधारले आहे. उत्पान्नत भरीव वाढ झाली आहे.यापुर्वी आम्हाला फक्त पावसाच्या पाण्यावर अवलंबुन राहावे लागत होते बंधारा झाल्यामुळे रब्बी पीके घेता येत आहे.त्यामुळे आमचे उत्पन्न डबल झाले आहे.